दि. 31/08/2026

**प्रेसनोट**

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची नांदेडमध्ये अवैध वाळू विरुध्द मोठी कारवाई

## 1 कोटी 35 लाख रुपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त

नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत होत्या. सदर अवैध रेती विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकास नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे वाहेगाव शिवारात पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक 30.08.2026 रोजी सायंकाळी 7.00 वाजता मौजे वाहेगाव शिवारातील वाळू धक्कयावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, एक इंजिन बोट, एक फायबर बोट, वाळूने भरलेले (17) तराफे यांच्यासहित, (2) हायवा, एक JCB मशीन व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (100) ब्रास वाळू, असा एकूण 1,35,40,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात (6) आरोपींविरुध्द कारवाई करुन, त्याचेविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरनं 1086/2026 कलम 303 (2), 3(5) भा.न्या.सं. सह कलम 48 (7), 48 (8) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम 9,15 पर्यावरण (संरक्षण) अधिनयिम व 3, 7 सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड.